जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

३१.०८.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ३१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## मदतीच्या बहाण्याने बसमध्ये घेतलं अन...

### १६ वर्षीय विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार, चालक-कंडक्टर अटकेत



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – राजधानी दिल्लीला हादरवून सोडणाऱ्या २०१२ च्या 'निर्भया' प्रकरणाची आठवण ताजी करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे.

उत्तर प्रदेशातील १६ वर्षीय विद्यार्थिनीवर धावत्या स्लीपर बसमध्ये सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आला. मुसळधार पावसात चुकीच्या ठिकाणी उतरल्याने ती अडकली होती. मदतीच्या बहाण्याने चालक आणि कंडक्टरने तिला बसमध्ये घेतले आणि सुमारे ४७ किलोमीटरच्या प्रवासादरम्यान तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणी चालक कुलदीप आणि कंडक्टर संदीप या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

'टाईम्स ऑफ इंडिया'च्या वृत्तानुसार, मैनपुरी जिल्ह्यातील ही मुलगी इयत्ता अकरावीत शिकते. ४ ऑगस्टच्या रात्री कुटुंबीयांशी वाद झाल्यानंतर ती नोएडात राहणाऱ्या चुलत भावाला भेटण्यासाठी घरातून निघाली.

मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे ती चुकून ग्रेटर नोएडातील परी चौक येथे उतरली. पुढे जाण्यासाठी वाहन शोधत असताना तिने एका रिकाम्या स्लीपर बसला हात दाखवला. चालक आणि कंडक्टरने बस नोएडा सेक्टर ६३च्या दिशेने जात असल्याचे सांगून तिला आत घेतले.

**४७ किलोमीटरच्या प्रवासात अत्याचाराचा आरोप**

बस सुरू झाल्यानंतर कंडक्टरने मुलीशी अश्लील चाळे करण्यास सुरूवार केली. त्यानंतर चालक आणि कंडक्टर दोघांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.बसने परी चौक ते काश्मीर गेट असा जवळपास ४७ किलोमीटरचा प्रवास केला. त्यानंतर तिला काश्मीर गेट बस टर्मिनलजवळील रिंग रोडवर सोडून आरोपी पसार झाले.

**दोन्ही आरोपी अटकेत**

पीडित मुलीने काश्मीर गेट पोलीस ठाणे गाठून तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी तिमारपूरमधील बस पार्किंग परिसरातून कुलदीप आणि संदीपला अटक केली. संबंधित बसही ताब्यात घेऊन फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहे.

## ५० लाखांचं सोनं अन ४ लाख रोख! विश्वासू हमालानेच मालकाचे हात-पाय बांधले : अकोल्यातील भरदिवसा दरोड्याने खळबळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अकोला** – अकोला शहरात भरदिवसा एक अतिशय धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. गेल्या चार ते पाच वर्षांपासून विश्वासाने कामावर ठेवलेल्या एका हमालानेच आपल्या मालकाचा विश्वासघात करत घरामध्ये मोठा दरोडा टाकल्याचा आरोप आहे. मालकाचे हात–पाय बांधून तब्बल ५० लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि ४ लाख रुपयांची रोख रक्कम लंपास करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.



अकोल्यातील रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहता मिल रोड, नया जीन परिसरात विजयकुमार गुप्ता हे वास्तव्यास आहेत. ते त्यांच्या घराच्या खालीच 'गुप्ता फ्लॉवर ऑइल इंडस्ट्रीज' नावाने व्यवसाय चालवतात. नेहमीप्रमाणे सोमवारी सकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास गुप्ता हे आपल्या कामगारांना कामाच्या सूचना देण्यासाठी खाली आले होते. मात्र, त्याच वेळी दबा धरून बसलेल्या तिघांनी त्यांच्यावर अचानक प्राणघातक हल्ला चढवला. विश्वासू हमालच निघाला मास्टरमाईंड विजयकुमार गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दरोड्याचा मुख्य सूत्रधार त्यांच्याकडे गेल्या चार ते पाच वर्षांपासून हमालीचे काम करणारा कामगारच आहे. मागील काही दिवसांपासून तो एका नवीन अज्ञात व्यक्तीला सोबत घेऊन येत होता. सोमवारी सकाळी त्याने आणखी एका साथीदाराला सोबत आणले आणि तिघांनी मिळून थेट घरात प्रवेश केला. मारहाण करून खोलीत डांबले घरात शिरताच या तिघांनी गुप्ता यांना जबर मारहाण केली आणि त्यांचे हात–पाय घट्ट बांधून एका खोलीत डांबून ठेवले. मालकाला असहाय्य केल्यानंतर आरोपींनी घरातील तिजोरीवर डल्ला मारला. यामध्ये गुप्ता यांचे अडीच लाख रुपये आणि त्यांच्या पत्नीचे दीड लाख रुपये अशी मिळून एकूण ४ लाखांची रोकड आणि ५० लाखांचे मौल्यवान सोन्याचे दागिने घेऊन आरोपी पसार झाले. पोलिसांकडून आरोपींचा कसून शोध भरदिवसा घडलेल्या या मोठ्या दरोड्याची माहिती मिळताच रामदास पेठ पो–लीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

## थोडक्यात

### शस्त्राच्या धाकावर आदिवासी विवाहितेवर अत्याचार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बुलढाणा** – बुलढाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील दुधलगाव परिसरात शेतात मजूर म्हणून असलेल्या एका १९ वर्षीय आदिवासी महिलेवर १८ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास शस्त्राच्या धाकावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली होती.

अखेर महिनाभरानंतर अत्याचार करणाऱ्या दोन नराधमांना बेड्या ठोकण्यात बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश मिळालं आहे. तब्बल ४० दिवस बुलढाणा पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल व तांत्रिक तपास करत मध्यप्रदेशातील बुऱ्हानपूर तालुक्यातून या दोन्ही नराधमांना बेड्या ठोकल्या आहेत.

## एमपीएससीच्या अध्यक्ष, सचिवांच्या राजीनाम्याची मागणी

### पेपरफुटीप्रकरणी शिंदे गटाचे बच्चू कडू आक्रमक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेतलेल्या अन्न आणि औषध निरीक्षक पदभरतीच्या पेपरफुटी प्रकरणात आयोगातील तीन अधिकाऱ्यांना अटक झाल्याने आयोगाचे अध्यक्ष आणि सचिव यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी रविवारी एक्स या समाज माध्यमातून केली. त्यांच्या राजीनाम्याची मागणी आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे.

पोलिसांच्या विशेष पथकाकडून तपास सुरू आहे. आयोगाचे सहाय्यक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते, गोपाळ मराठे, अवर सचिव अभिजीत लेंडवे यांना अटक केली आहे. वरिष्ठ आयएएस दर्जाचाच अधिकारी नेमा

एमपीएससीचे अध्यक्ष आणि सदस्य हे राजकीय संपर्क विरहित असणारेच असावेत, तर सचिव हा मंत्रालय कॅडरचा नियुक्त न करता वरिष्ठ आयएएस दर्जाचाच अधिकारी असला पाहिजे, अशी भूमिकाही कडू यांनी मांडली आहे.

**विद्यार्थ्यांसाठी रस्त्यावरची लढाई लढू**

आयोगाच्या सध्याच्या सहसचिव आणि परीक्षा नियंत्रक यांच्या प्रतिनियुक्तीसाठी आयोगाची मान्यता नसताना परस्पर मनमानीपणे मंत्रालयातील अधिकारी एकतर्फी आयोगात पाठवण्याच्या तक्रारीची सखोल चौकशी करावी. या पदावरील व्यक्तीची नियुक्ती नियमबाह्य असल्याने ती तत्काळ रद्द करावी. प्रश्नफुटी संदर्भात प्राथमिक जबाबदारी परीक्षा नियंत्रक यांची असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा नोंदवावा, अशा मागण्या कडू यांनी केल्या आहेत.

## पालिका सुधार समितीत महायुतीत खदखद

### भाजप नगरसेवकांची पक्षनेतृत्वाकडे तक्रार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबई महापालिकेतील सत्ताधारी महायुतीमध्ये मतभेद उफाळून येत असल्याचे संकेत मिळत असून सुधार समितीच्या कामकाजावरून भाजप आणि शिवसेनेत नाराजी वाढल्याचे समोर आले आहे. सुधार समितीच्या अध्यक्षा तथा शिवसेना नगरसेविका संध्या दोशी यांच्या कार्यपद्धतीबाबत भाजपच्या नगरसेवकांनी पक्षाध्यक्ष आमदार अमित साटम यांच्याकडे तक्रार केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

गेल्या आठवड्यात सुधार समितीतील भाजप सदस्य नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने साटम यांची भेट घेतली. वडाळ्यातील दोन भूखंड एकत्र करून विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या (डीसीपीआर) कलम ३३(७) अंतर्गत पुनर्विकासाला मंजुरी देण्याच्या प्रस्तावाचे उदाहरणही यावेळी देण्यात आले.

भाजप सदस्यांमध्ये नाराजी सुधार समितीत भाजपचे नऊ तर शिवसेनेचे केवळ तीन नगरसेवक आहेत. त्यामुळे कोणताही प्रस्ताव मतदानासाठी आला तर भाजपचे बहुमत निर्णायक ठरू शकते, असा भाजप सदस्यांचा दावा आहे. मात्र, मतदानच घेतले जात नसल्याने सदस्यांच्या मताला महत्त्व दिले जात नसल्याची भावना भाजप नगरसेवकांमध्ये आहे.

नगरसेविकेच्या पतीचा हस्तक्षेप भाजपने शिवसेनेचे गटनेते अमेय घोले यांच्याकडेही नाराजी व्यक्त केली असल्याचे समजते. सुधार समितीच्या बैठकीत संध्या दोशी यांच्या पतींचा हस्तक्षेप होत असल्याचाही आरोप काही भाजप नेत्यांनी केला आहे. बैठकीपूर्वी होणाऱ्या अनौपचारिक बैठकीत ते उपस्थित राहून मत व्यक्त करतात, अशी माहिती भाजप नेत्यांनी दिली. मात्र शिवसेना नेत्यांनी हे आरोप फेटाळून लावले.

## डीबीटी रद्द, मेसची सुविधा पुन्हा सुरू

### वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सरकारचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृहांमध्ये भोजनासाठी दिली जाणारी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना बंद करून आता 'मेस'ची सुविधा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सरकारने २०१८ मध्ये डीबीटी योजना सुरू केली होती. मात्र, विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर फडणवीस यांना योजना गुंडाळावी लागली आहे.

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी छेडलेल्या आंदोलनाची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शनिवारी 'वर्षा'वर विद्यार्थी आंदोलकांशी चर्चा केली. कालबद्ध कृती आराखडा तयार होणार राज्यातील शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थी मृत्यूच्या कारणांचा अभ्यास करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीच्या अहवालावरील शिफारशींवर कार्यवाही करून संबंधित उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश आदिवासी विकास विभागाला देण्यात आले आहेत.



# अधिकारी व कर्मचारी यांना राखी बांधुन रक्षाबंधन साजरी

**रक्षाबंधनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा स्तूत्य उपक्रम**





*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत सरकारी रुग्णालयातील डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी, एस.टी.महामंडळ आगार व्यवस्थापक व सर्व कर्मचारी तसेच पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्य सेवेसाठी तसेच नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाची सेवा सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या पोलीस, आरोग्य विभाग आणि एस.टी.महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रती यावेळी आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी सविता काळे, रुपाली पुंड, रजनी भोंडे, मनिषा उईके, रोशनी तडस, पूजा नरहरे, दीपिका वाघमारे, शीतल धोटे, अनिता चांदणे, जमीर पटेल, धीरज पंडागळे, वसीम शेख यांची उपस्थिती होती. उपस्थित महिला पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हातावर राखी बांधून त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

# दिल्लीला कांदा पोहोचला अन लासलगावात दर घसरला : शेतकऱ्यांना पावणेतीन कोटींचा फटका

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**लासलगाव** – सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या बफर स्टॉकमधून लासलगाव येथून दिल्लीला ४५३ मेट्रिक टन कांदा पाठवला.

गेले चार दिवस कांद्याच्या दरात टप्प्याटप्प्याने घसरण होऊन ४५० रुपयांची घट झाली. त्याचा थेट फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला.


लासलगाव मुख्य बाजारसह उपबाजार विंचूर आणि निफाड आवारावर शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या ७५३३४ क्विंटल कांद्यामागे सुमारे २ कोटी ७६ लाख ९३ हजार २५० रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

**परमहंस यशवंतबाबा समाधी स्थळ येथे उसळला जनसागर**

# हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**चांदस वाठोडा–** येथुन जवळच असलेल्या परमहंस श्री यशवंत बाबा संस्थान मुसळखेडा येथे नारळी पौर्णिमा अतिशय उत्सावामध्ये साजरा करण्यात आला.

परिसरामध्ये नव्हे तर संपुर्ण विदर्भात प्रसिद्ध असलेले लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री परमंहस यशवंतबाबा देवस्थान मुसळखेडा येथे नारळी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन उत्सवा निमित्याने भाविक भक्तांच्या सानिध्यात, यशवंत नाम गजरात अतिशय आनंददायी वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी नव्याने सुरु झालेल्या श्री यशवंत अन्नछत्रमध्ये हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

२७ व २८ ऑगस्ट २०२६ ला दोन्ही दिवस पौर्णिमा असल्यामुळे भाविक भक्तांची गर्दी सकाळ पासुनच सुरू झाली होती. श्री यशवंतबाबा संस्थान मुसळखेडा यांनी दर पौर्णिमेला सुरु केलेल्या श्री यशवंत अन्नछत्र महाप्रसाद निमित्याने या पौर्णिमेला वरुडच शासकीय कंत्राटदार दिपक बोंदरे, वर्धाचे पुंडलिक कवटकर यांच्या तर्फे आयोजित करण्यात आला होता.

श्री यशवंत अन्नछत्र महाप्रसादाचा लाभ सकाळी ७ वाजता पासून ते रात्री १० पर्यंत भाविक भक्तांसाठी खुला सुरु ठेवण्यात आलेले होते. यावेळी भक्तिमय वातावरणात निर्माण करण्यात नवशक्ती भजन मंडळ टेंभुरखेडा, माऊली भजन संच, मुसळखेडा व अवधुती भजन मंडळ चांदस वाठोडा याच्या मधुर वाणीतुन भक्तिमय यशवंत माऊली भजनांनी सर्व भाविक भक्तांना मंत्र मुग्ध करण्यात आले.

परमहंस श्री यशवंतबाबा संस्थान मुसळखेडा कार्यकारीणी यांच्या तर्फे सर्व भाविक भक्त, सर्व स्वयंसेवक, कार्यकर्ते तसेच सर्व दानदात्यांचे यशवंतबाबा संस्थानच्या वतीने आभार व्यक्त केले.

**महात्मा फुले इंग्रजी पुर्व प्राथमिक शाळेत**

# राखी स्पर्धा व रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*





**शेंदुरजनाघाट** – महात्मा फुले इंग्रजी पुर्व प्राथमिक शाळेत राखी स्पर्धा व रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात वर्ग १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची राखी स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पाना फुलापासुन राखी, टिकली, टाकाऊ पासुन टिकाऊ बडस, विविध डाळी, क्ले, टिकल्या, तांदूळ, मोरपंख, मनी, इत्यादी साहित्याचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर राख्या बनविल्या. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्यात आला तसेच या उपक्रमातुन विद्यार्थ्यांना राखी सणाचे महत्व पटवुन दिले. मुख्याध्यापिका अर्चना मोघे व इतर शिक्षकांनी राखीचे परीक्षण केले. १ ली ते २ री विद्यार्थ्यांच्या गटातुन आणि ३ री ते ४ थी या गटातुन नंबर काढण्यात आले व प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता तसेच शाळेच्या विद्यार्थिनींनी मुलांना राखी बांधली ओवाळले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका अर्चना मोघे आणि सर्व शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता मुख्याध्यापिका अर्चना मोघे, शिक्षिका गायत्री आंडे, करुणा निंबुरकर, शुभांगी पांडे, मेघा मोरे, पूजा मेंढे, मंजुषा अकर्ते, प्रियंका कोडापे, करिश्मा पोहरकर, अश्विनी रडके, कर्मचारी वृंद माधुरी सुपले, वनिता वानखेडे, वैभव सावरकर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# गेटवे-मांडवा जलवाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर : एआयपीएची सुरक्षित जलवाहतुकीची मागणी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**अलिबाग** – गेटवे ऑफ इंडिया–मांडवा जलमार्गावर दरवर्षी सुमारे ३५ ते ४० लाख प्रवासी प्रवास करतात. पावसाळ्यातील खंडानंतर या मार्गावरील जलवाहतूक सेवा पुन्हा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या मार्गावर धावणाऱ्या अनेक लाँचेस आणि फेरीबोटी ४० ते ५० वर्षे जुन्या असल्याने भर समुद्रात बिघाड होणे, भरकटणे तसेच अपघात होण्याच्या घटना घडत असल्याचा आरोप ऑल इंडिया पॅसेंजर्स असोसिएशनने (एआयपीए) केला आहे. त्यामुळे लाखो प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे सांगत अद्ययावत आणि सुरक्षित जलवाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी एआयपीएचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केली आहे.

मोकल यांच्या नेतृत्वाखालील एआयपीएच्या शिष्टमंडळाने नुकतीच मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. एम. अंगामुथु यांची मुंबईतील पोर्ट भवन येथे भेट घेतली. यावेळी मुंबई हार्बरमधील जलवाहतूक प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे त्यांचे लक्ष वेधण्यात आले. या मागण्यांची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती एआयपीएने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून दिली आहे. मुंबई आणि रायगडला जोडणारा गेटवे–मांडवा जलमार्ग पर्यटक आणि प्रवाशांसाठी सोयीचा ठरत आहे. मुंबईहून रायगडमध्ये येणारे लाखो पर्यटक या मार्गाचा वापर करतात.

# प्रा.आनंदराव मानकर यांचे निधन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**वरुड** – महात्मा फुले कला वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आनंदराव रामजी मानकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी आज दुपारच्या सुमारास दिर्घ आजाराने निधने. ते गेल्या काही दिवसांपासुन शहरातील प्रसिध्द हृदरोग तज्ञ डॉ.राम गोधने यांचे रुग्णालयात उपचार घेत होते परंतु आज दुपारी १२.२५ च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच अनेकांनी रुग्णालयात तर त्यानंतर त्यांच्या महात्मा फुले नगर निवासस्थानी जावुन त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता केदारेश्वर मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा अंशुमन, २ मुली, सुन, जावई, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने शहरात शोक व्यक्त केल्या जात आहे.

**आई इंदुमती सोंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने**

# पुसला येथे वैकुंठ रथाचे लोकार्पण




*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' या माध्यमातुन पुसला येथील सोंडे परिवाराने घेतलेला वसा कायम ठेवत आई इंदुमती सोंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने वैकुंठ रथाचे लोकार्पण करुन साजरा केला.

पुसला गावातील तथा तालुक्यातील परिचित इंद्रभुषण सोंडे यांचे कुटूंब नेहमीच वाढदिवस हा लोक कल्याणकारी जनतेच्या उपयोगात येण्यासाठी साजरा करतात. सामाजिक बांधिलकी जपत गेल्या १० वर्षापासुन रुपाली सोंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी व हजारांचे वर शस्त्रक्रिया केल्या. रक्तदान शिबिर, झाडे लावणे, गरजुंना मदतीचा हात, शैक्षणिक साहित्य वाटप असे उपक्रम राबवुन वाढदिवस साजरा करतात.

यावेळी गावाची गरज ओळखुन त्यांची आई श्रीमती इंदुमती श्रीराम सोंडे यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे वडील स्व.श्रीराम विठोबा सोंडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वैकुंठरथाचे लोकार्पण करुन साजरा केला. पुसला येथील भवानी माता मंदिरामध्ये भजन तसेच श्री गुरुदेव यांची सामुदायिक प्रार्थना घेऊन भक्तिमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला.

यावेळी गावातील जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती. या उपक्रमाबद्दल सोंडे कुटूंबियांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मेजर ध्यानचंद यांनी क्रीडा क्षेत्रात मौलिक योगदान दिले : मेजर ध्यानचंद सिंग जयंती प्रसंगी डॉ.प्रशांत चर्जन यांचे प्रतिपादन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**शेंदुरजनाघाट** – मेजर ध्यानचंद सिंग यांच्या क्रीडा क्षेत्रातील महत्त्वपुर्ण कामगिरीचा सविस्तर परामर्श घेतला. १९२८, १९३२ व १९३६ मध्ये भारतासाठी ऑलम्पिक मध्ये सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचे कार्य आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी भारताच्या क्रीडा क्षेत्रात मौलिक योगदान दिले असे विचार त्यांनी मांडले असे प्रतिपादन डॉ.प्रशांत चर्जन यांनी केले.

येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मेजर ध्यानचंद सिंग यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणुन उत्साहात साजरी करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन शारीरिक शिक्षण संचालक डॉ.प्रशांत चर्जन तर प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.दिनेश खेरडे, प्रा.सुधीर बानुबाकोडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे विचारपीठावर उपस्थित होते. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

प्राचार्य डॉ. रा.ना.फुलारी यांनी हॉकीपटु मेजर ध्यानचंद यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन सोनाली धुर्वे तर पुनम दामेधर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# संपादकीय

## आता कसोटी अपेक्षापूर्तींची

अखेर नऊ वर्षांनंतर का होईना मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शहरात वेगळीच हवा तयार होते. कोण जिंकलं, कोण हरलं, कोण सत्तेत आलं - यावर चर्चा तर होतेच, पण त्याहून जास्त चर्चा होते ती सामान्य माणसाच्या अपेक्षांची. कारण ही निवडणूक म्हणजे फक्त राजकीय पक्षांचा खेळ नाही, तर आपल्या रोजच्या आयुष्याशी थेट जोडलेली गोष्ट आहे. आपण चालतो ते रस्ते, आपण पितो ते पाणी, आपण प्रवास करतो ती बस, रुग्ण जातो ते रुग्णालय, मुलं जातात ती शाळा - हे सगळं पालिकेवर अवलंबून असतं. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लोकांच्या मनात आनंद, आशा, अपेक्षा आणि थोडी भीती - अशा सगळ्या भावना एकत्र येतात. सगळ्यात आधी लोकांना वाटतं,'आपण दिलेलं मत वाया गेलं नाही.' मतदानाच्या दिवशी रांगेत उभं राहून, ऊन-पावसाची तमा न बाळगता दिलेलं मत आता कुणाच्या तरी हातात सत्ता देतं, ही जाणीव लोकांना समाधान देते. प्रचारात उमेदवारांनी आणि पक्षांनी जी वचने दिली, ती आता तरी पूर्ण होतील, अशी आशा सगळ्यांच्या मनात असते. आपल्या भागातले खड्डे बुजतील, रस्ते नीट होतील, पाणी वेळेवर येईल, कचरा रोज उचलला जाईल, असं साधं-सोपं जगणं लोकांना हवं असतं पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, घरात पाणी घुसू नये, गटारं तुंबू नयेत, दुर्गंधी कमी व्हावी ही सामान्य माणसाची सगळ्यात मोठी अपेक्षा असते. आजारी पडलो तर जवळच दवाखाना असावा, तिथे डॉक्टर मिळावा, औषध मिळावं, रांगेत तासन्तास उभं राहावं लागू नये, असं त्यांना वाटतं. शाळेत शिक्षक वेळेवर यावेत, मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, शाळा स्वच्छ असावी, चांगल्या पद्धतीचे शिक्षण घेऊन एक चांगली पिढी तयार व्हावी एवढंच त्यांना हवं असतं. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांसाठी निवडणूक म्हणजे आयुष्य बदलण्याची आशा असते. पक्कं घर, नळाचं पाणी, शौचालय, वीज, ड्रेनेज, कचरा उचलण्याची नीट सोय हे सगळं त्यांना फार महत्त्वाचं वाटतं. योजना जाहीर होतात, पण त्या प्रत्यक्षात याव्यात, फक्त कागदावरच राहू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. पुनर्वसन करताना लोकांना त्रास न होता, सन्मानाने घर मिळावं, अशी त्यांची अपेक्षा असते. तरुण मुलं-मुलींना नोकरीची, कामधंद्याची, शिकण्याच्या संधींची फार अपेक्षा असते. शहरात ट्रेन-बस नीट चालाव्यात, गर्दी कमी व्हावी, प्रवास थोडा तरी सोपा व्हावा, असं त्यांना वाटतं. सरकारी कामं ऑनलाइन सोपी व्हावीत, प्रमाणपत्र, परवाना, जन्मदाखले , मृत्यू प्रमाणपत्र , कर यासाठी ऑफिसात चकरा माराव्या लागू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. शहर आधुनिक व्हावं, पण त्याचा फायदा फक्त श्रीमंतांनाच नाही, तर सामान्य माणसालाही व्हावा, हीच त्यांची खरी अपेक्षा असते.महिलांना सगळ्यात जास्त हवं असतं ते म्हणजे सुरक्षितता. रस्त्यावर दिवे असावेत, बस-रेल्वेत सुरक्षित वाटावं, रात्री उशिरा घरी जाताना भीती वाटू नये, असं त्यांना वाटतं. सार्वजनिक शौचालय स्वच्छ असावीत, दवाखान्यात महिलांसाठी नीट सोय असावी, गरोदर महिलांची नीट काळजी घेतली जावी, अशी त्यांची अपेक्षा असते. महिलांना कामधंद्याच्या संधी मिळाव्यात, प्रशिक्षण मिळावं, स्वतःच्या पायावर उभं राहता यावं, हीसुद्धा मोठी अपेक्षा असते. वृद्ध लोकांना शांत आणि सुरक्षित आयुष्य हवं असतं. चालायला चांगले रस्ते, बसायला बाक, बागा, मोफत किंवा स्वस्त औषधं, सरकारी दवाखान्यात नीट इलाज एवढंच त्यांना पुरेसं वाटतं.

## सुविचार

रत्येकात काही विशेष गुण असतातच पण जर तुम्ही माश्याची परीक्षा त्याच्या झाडावर चढण्याच्या क्षमतेवर करू लागलात तर तुम्ही सर्व आयुष्य त्याला मुर्खच समजत राहाल.

# भाजप दक्षिण महाराष्ट्रात काठावर पास!

भाजपला दक्षिण महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही, पण ते टिकून राहिले. यामागे मराठा आरक्षणाचा मुद्दा, स्थानिक गटबाजी आणि महाविकास आघाडीची मजबूत पकड ही प्रमुख कारणे असू शकतात, ज्यामुळे भाजपला मोठी आघाडी घेता आली नाही, अशी राजकीय विश्लेषकांची भूमिका आहे.

सांगली-मिरज-कुपवाड, कोल्हापूर आणि इचलकरंजी या महानगरपालिकांच्या निकालांनी दक्षिण महाराष्ट्राच्या राजकीय




क्षितिजावर भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि महायुतीने मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. मात्र तरीही ते काठावरचे आहे. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात त्यामुळे अधिक कष्ट करावे लागतील. राज्यभरातील २९ महानगरपालिकांपैकी अनेक ठिकाणी महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असताना, दक्षिण महाराष्ट्रातील हे निकाल विशेष महत्त्वाचे ठरतात. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेत भाजपने सर्वाधिक जागा जिंकून आपली मजबूत उपस्थिती दाखवली. ही पारंपरिकपणे काँग्रेस-प्रभावित असलेली जागा आता विकासाच्या मुद्द्यांवर भाजपच्या बाजूने झुकली आहे. पण भाजपला ३९ आणि उर्वरित पक्षांना ३९ जागा मिळाल्याने शिंदे शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला विनंती करण्याची वेळ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर आली आहे.


ज्या तडजोडी होतील त्यानुसारच सांगलीचा निर्णय घेतील अशी सध्याची स्थिती आहे. त्यामुळे पुढचे किमान चार दिवस इथली राजकीय परिस्थिती दोलायमान असणार आहे. अर्थात सगळे विरोधक मिळून आकडा ३९ होत असल्याने त्यांना वाढीला मर्यादा आहेत. भाजप मात्र शिवसेनेच्या दोन जागा किंवा अजित पवार राष्ट्रवादीच्या १६ जागा असल्याने त्यांच्याशी हात मिळवणी करून ४० पेक्षाही भरभक्कम बहुमत मिळू शकते. मात्र त्यासाठी हे मित्रपक्ष कोणत्या अटीवर तयार होतील ते सांगता येणे अवघड आहे. अर्थात या ठिकाणी शरद पवार राष्ट्रवादीचे तीन सदस्य फोडून आपल्याकडे वळवण्यात सुद्धा भाजप लक्ष घालू शकते. काँग्रेस सोडून इतर सर्वांशी युती अशी त्यांची भूमिका आहे. त्यालाही इतर पक्ष काय साथ देतात यावर या रणनीतीचे भविष्य अवलंबून असेल.

# मोरपीस

स्पर्श म्हणजे जाणीव जागृतींचा काही वेळेसाठी घडलेला सहवास. कळत नकळत होणारा हाताचा हाताशी समेट, शरीराने शरी-राला हलकासा दिलेला झोका त्यातून मन पाखरू पाखरू शहारत गेलेला भावनिक गुंतागुंतीचा ओझरता मखमली स्पर्श जणू काही हर्षचं. स्पर्शाला जाणीव आसक्ती जडता भौतिक सुखाच्या मोहमयी ओलाव्याची संवेदनशील छाया असं देखील म्हणता येईल. गरम, मऊ, खरखरीत, ऊबदार या भौतिक संवेदनेत स्पर्शाची सुबक व्याख्या सापडेल. नितळ त्वचेला सुखावणारी संवेदना कधी हवा, पाणी, वस्तूंच्या स्पर्शातून, तर कधी आपुलकी विश्वासाच्या समेवर भावनिक सौम्य स्पर्शाची अनुभुती देईल. सौहार्द प्रेमातून आलेली भावना सहवासायोगे मनाला आधार देत जगण्याची उभारी घेईल. नाजूक शरीराची नाजूक त्वचा स्पर्श संवेदनेचं महत्वाचं अंग असल्याने वरचेवर ते जागृत होईल. मनाला मनाची, सुखाला सुखाची, शरीराला शरीराची कायम ओढ राहील. मानवासाठी स्पर्शाचा अर्था अर्थी संबंध इथून तिथून सारखाचं असल्याने स्पर्शाच्या पहिल्याच पायरीवर असलेला मातेचा उबदार स्पर्श आठवा, जो जगातल्या सर्वोत्तम वेदनेला आश्वासक ऊब देतो. प्रसूती वेदनेनंतर ममत्व जागृती स्पर्शाने आईस पान्हा फुटतो. बाळ जन्मल्यानंतर आईचा परीस स्पर्श झऱ्यागत वाहू लागतो. लोण्यागत मऊशार कुशीतली ऊब हवीहवीशी वाटू लागते. आई म्हणजे ममत्व. आई म्हणजे जगण्याचं एकमेव ठिकाण. विश्वासाचं हक्काचं पान, अशावेळी स्पर्शाची भावना जितकी नाजूक तितकीचं ती संवेदनशील होते. भाव भावनांचे विविधांगी पदर यात अनुभवास येतात. भावनेच्या अत्युच्य अविष्काराकडे मन ओढलं जात.

आयुष्यातला दुसरा माऊली स्पर्श पंढरपूरी विठोबारायाच्या पद स्पर्शाची ओढ लावणारा, भक्तीपुरात दंग करणारा. चराचरात वसलेल्या पांडुरंगाची आस अंतरंग स्पर्शून जावी या प्रतीक्षेत भक्त असतो. ज्ञानामृताच्या स्पर्शासाठी तन मन धन सगळं विसरून जातो. त्यासमयी 'सोहळा पालखीचा नयनी साठवावा, माऊली पदस्पर्श आशीर्वाद घ्यावा 'म्हणत अखखी पंढरी दुमदुमते.

जगण्याच्या असंख्य वाटांवर अनेक स्पर्शांचे कळत नकळत आधार घेत आपण पुढे जात असतो. त्या त्या वेळी ते ते स्पर्श मोलाची कामगिरी करत असतात, जेणेकरून पुढे जाऊन वेदनाही सुखावह होते. 'वेदनेला उमजे, मायेचा पदर... स्पर्शाची भाषा, शब्दातीत सादर.' बऱ्याचं अंशी हे स्पर्श आपण गृहीतचं धरून चालतो. परंतु त्यांना



मुकल्यानंतर त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आयुष्यात जाणवू लागते आणि हलक्याशा भावभरल्या स्पर्शासाठी मन आसुसते. तेव्हा काय काय दाटून येतं ठाऊक आहे का? नात्यात पडलेली वजाबाकी आठवते. भाग काढून घातलेला विचित्र गुणाकार साठू लागतो आणि कळू लागत बेरजेचं गणित. 'स्पर्शाची दुनिया सारी, भावार्थ सांगून जाती, स्पर्शाभोवती हळवी, वसती नाजूक नाती...' पुढे स्पर्शाच्या उतरंडीमध्ये वरच्या स्थानावर ज्याची वर्णी लागते तो म्हणजे पारदर्शी मैत्रीचा नितळ आरस्पानी स्पर्श होय. ज्याला स्त्री पुरुष भेदाभेद वय, प्रांत, भाषा अशी कोणतीही भिंत अडवू शकत नाही.

मैत्री करून पाहावी आणि तेवढीचं निभवावी. दुर्बिणीतून न्याहाळावी तशी स्पर्शाची विविध रूपं समोर येऊ लागतात. स्पर्श नजरेचाही असतो. आश्वासक, आधार देणारा, जपणारा, जोजवणारा, आनंदयात्री, डोळ्यांत आसवं आणणारा, घाबरणारा, घाबरवणारा, किळसवाणा, ओंगळ नजरेचा स्पर्श प्रत्यक्ष शरीर स्पर्शापेक्षाही प्रभावी ठरतो. तान्ह्या बाळाचा स्पर्श हा पृथ्वीतलावरील सर्वात लडीवाळ मुलायम स्पर्श होय. मलिनतेच्या लाटांपासून दूर असलेला पवित्र निसर्गाचा स्पर्श. थंडीच्या दिवसात अंगाशी लगट करणारे बोचरे वारे आठवून पाहा.

आठवून पाहा पावसाच्या पहिल्या थेंबाने रोमांचित झालेले मन...अखखा श्रावण मनासह शरीर कार्यान्वित करतो. नेहमी वरच्या क्रमांकावर असलेला, दाटीवाटीच्या युगल मिठीत, लग्नगाठ बांधण्यासाठी सरस-ावलेला चोर स्पर्श. 'प्रेमाची भेट प्रेमाच्या गाठी ओलावा संपताच उरत नाहीत पाठी... आठवांचा खेळ उगा मागे उरतो, रागरूसव्यात जो तो गुदमरतो... त्याच्या-तिच्या सानिध्यातील आठवून पाहा संध्याकाळ... पहिली भेट, मावळतीचा सूर्य... बोचणारा वारा, नजर गुपित, घट्ट धरलेला हात! मनीची भाषा, अवगेल का त्याला? तूच माझी राणी, तो त्या दिवशी म्हणाला... हाती तुझा हात दे काहीतरी गुणगुणला... तू फक्त हो म्हण, तो हरपला... हीच माझी ओढ अनब, हाच खरा जिवलग... मी ही लाजून हो म्हंटल जरा! तो म्हणाला, भेटीत हवा विश्वास ज्याने वाढेल सहवास... सहवासावर रचू सुखाचा संसार... स्पर्श करता वेलीला येई आकार. तूच माझी राणी अनब मी तुझा सखा... सुखी जीवनात सहवासी स्पर्श हवा.

निसर्गाने स्पर्शाची एक सुंदर देणगी आपल्याला बहाल केलेली आहे. स्पर्श म्हणजे अभिव्यक्तीचे एक सशक्त माध्यम. विशेष उल्लेखनीय म्हणजे घरातील, समाजातील, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना कपडालत्ता, औषध, पैसा, अन्नपाणी या गोष्टी पलीकडे आसं असते मायेच्या संवादाची.

आपले म्हणणे मांडण्याची, दुसऱ्याचे ऐकण्याची आणि सर्वांच्या पलीकडे एक खोल आस असते स्पर्शाची. घरातील ज्येष्ठांना असा स्पर्श आपण मागे कधी केलाय का? आठवून बघा. नसेल ना आठवत...! तर एक गोष्ट करा. त्यांच्याजवळ बसा. त्यांचा हात आपल्या हातात घ्या. डोक्यावरून मायेने हात फिरवा, आणि पहा साधे वाटणारे स्पर्श काय काय किमया करतात ते. निसटून गेलेल्या स्पर्शाचे सुरेख पैलू अनुभवून तर पहा. केवळ स्पर्शाने चमत्कार झाल्याची अनेक उदाहरणे देता येतील. विस्मृतीत गेलेल्या स्पर्श अनुभूतीच्या आठवणीत आपला दिवस गोड जावा म्हणून हाती घेतलेल्या मोरपंख ललितबंध लिखाणावरील दौतस्पर्श आपल्या सेवेशी सादर आहे.

# आवाज हरपण्याचे दिवस संपले

भारतामध्ये डोके व मान कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. या कर्करोगांमध्ये तोंड, घसा (आवाजपेटी), थायरॉईड, सायनस, नाक तसेच लाळग्रंथी यांचा समावेश होतो. यापैकी आवाजपेटीचा कर्करोग हा तोंडाच्या कर्करोगानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अनेक वर्षे या कर्करोगावर संपूर्ण आवाजपेटी काढून टाकणे (टोटल लॅरिंजेक्टॉमी) हा सर्वोत्तम उपचार मानला जात होता. जरी यामुळे कर्करोग बरा होण्याचे प्रमाण चांगले होते, तरी रुग्णाचा आवाज कायमचा हरपायचा. मात्र आजच्या प्रगत तपासणी आणि उपचारांमुळे बहुतेक रुग्णांमध्ये आवाजपेटी जपण्यावर भर दिला जातो.

धूम्रपान आणि मद्यपान ही आवाजपेटीच्या कर्करोगाची दोन प्रमुख कारणे आहेत. हा कर्करोग प्रामुख्याने ५० ते ७० वयोगटातील पुरुषांमध्ये अधिक आढळतो. सततचा घसा बसणे किंवा आवाजात बदल होणे हे याचे सुरुवातीचे



आणि महत्त्वाचे लक्षण आहे.

कर्करोग लवकर ओळखला गेला तर ट्रान्सओरल लेझर मायक्रोसर्जरी (टीएलएम) या आधुनिक पद्धतीने उपचार करता येतात. लेझरच्या साहाय्याने आवाजपेटीतील लहान गाठी काढल्या जातात. या उपचारामुळे सुमारे ९० टक्के रुग्ण पूर्णपणे बरे होतात, आवाज व गिळण्याची क्षमता टिकून राहते, खर्च तुलनेने कमी असतो आणि बहुतेक वेळा हा उपचार डे-केअर पद्धतीने केला जातो.

मध्यम टप्प्यातील कर्करोगात रेडिएशन थेरपीसोबत केमोथेरपी दिली जाते. या उपचारपद्धतीमुळे अवयव जपण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून ८० टक्क्यांहून अधिक रुग्णांचा नैसर्गिक आवाज कायम राहतो.

प्रगत अवस्थेतील रुग्णांना अजूनही संपूर्ण आवाजपेटी काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागू शकते. मात्र आजच्या घडीला आवाज पुनर्वसनासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. व्हॉइस प्रोस्थेसिस, इलेक्ट्रॉनिक लॅरिंक्स किंवा अन्ननलिकेच्या सहाय्याने बोलण्याचे प्रशिक्षण. यामुळे अशा रुग्णांनाही पुन्हा संवाद साधता येतो.

आधुनिक उपचार आणि समर्पित पुनर्वसनामुळे कर्करोगामुळे आवाज गमावणे आता अटळ राहिलेले नाही. आज बहुतेक रुग्ण आपला नैसर्गिक आवाज जपू शकतात आणि ज्यांना मोठी शस्त्रक्रिया करावी लागते, तेही योग्य प्रशिक्षणामुळे पुन्हा बोलू शकतात. वेळेवर तपासणी आणि योग्य उपचारांमुळे प्रत्येक रुग्णाला केवळ आपला आवाजच नव्हे, तर आत्मविश्वास आणि जीवनाचा दर्जाही पुन्हा मिळवण्याची संधी मिळू शकते.

# महाराष्ट्राची दावोसमध्ये ऐतिहासिक भरारी : 'थर्ड मुंबई' प्रकल्पासाठी ११ जागतिक कंपन्यांसोबत सामंजस्य करार

दावोस जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र सरकारने राज्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने एक मैलाचा दगड गाठला आहे. रायगड जिल्ह्यातील 'पेण ग्रोथ सेंटर' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी एमएमआरडीए आणि जगातील विविध ११ अग्रगण्य कंपन्यांमध्ये सामंजस्य करार (चेण) करण्यात आले आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे करार स्वाक्षरित करण्यात आले. 'तिसरी मुंबई' म्हणून ओळखला जाणारा हा प्रकल्प तंत्रज्ञान, फिनटेक आणि डेटा सेंटर्सचे पुढील पिढीचे केंद्र ठरणार आहे. या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे भारताचा पहिला समर्पित 'ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर' जिल्हा उभारला जाणार आहे. यामध्ये दक्षिण कोरियाचा हनव्हा ग्रुप, अमेरिकेची फेडएक्स, स्वित्झर्लंडची आणि सिंगापूरचा मॅपल ट्री यांसारख्या जागतिक दर्जाच्या कंपन्यांचा समावेश आहे. या गुंतवणुकीमुळे रायगड जिल्हा केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर देशाचा नवीन आर्थिक कणा म्हणून उदयास येणार आहे. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक कंपन्यांना रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये गुंतवणूक करण्याचे खुले आवाहन केले. 'हा प्रकल्प पुढील पिढीच्या तंत्रज्ञानासाठी सज्ज आहे आणि जागतिक व्यवसायांसाठी हे एक सर्वोत्तम केंद्र ठरेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या करारामुळे राज्याच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार असून हजारो रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. ३५ लाख उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण होणार दरम्यान, जागतिक स्तरावर महाराष्ट्राची विश्वासार्हता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, विदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे भारताचे खरे 'गेटवे ऑफ इंडिया' आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत ते बोलत होते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

नवयुवक शिक्षण संस्था संचालित एनटीआर हायस्कूलमध्ये

# वृक्षाला राखी बांधून वृक्षसंवर्धनाचा संदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था संचलित एनटीआर हायस्कूलमध्ये रक्षाबंधनाच्या निमित्ताने वृक्षसंवर्धनाचा अनोखा संदेश देत झाडांना राखी बांधण्याचा उपक्रम उत्साहात घेण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून 'वृक्ष हेच आपले खरे जीवनसाथी' असा पर्यावरणपूरक संदेश दिला. याच निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी राखी मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार करून स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वृक्षांप्रती प्रेम, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शन मुख्याध्यापक योगेश बरडीया यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक शशांक पाचघरे, शिक्षक प्रतिनिधी सतीश डाखोळे तसेच विशेष सहकार्य पल्लवी गोरडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश पोहोचला. वृक्षाला राखी बांधण्याचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी भावनिक तसेच पर्यावरणपूरक संस्कार देणारा ठरला.

# भारतीय मानक वेळ अनिवार्य करणारे नियम सरकारकडून जारी

अंमलबजावणीसाठी १८० दिवसांची मुदत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – सरकारने देशभरात कायदेशीर, प्रशासकीय, व्यावसायिक आणि इतर अधिकृत कामांसाठी 'भारतीय मानक वेळ' ही एकच वेळ प्रमाणीकृत मानणे बंधनकारक करणारे 'लीगल मेट्रोलॉजी रूल्स, २०२६' अधिसूचित केले आहेत. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने २७ ऑगस्ट रोजी हे नियम अधिसूचित केले असून, अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १८० दिवसांनंतर ते लागू होतील. यामुळे सरकारी विभाग, व्यावसायिक आणि विविध संस्थांना त्यांच्या प्रणाल्या सुधारण्यासाठी आणि नवीन मानकांनुसार जुळवून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. बँकिंग, डिजिटल पेमेंट, दूरसंचार, रेल्वे, पॉवर ग्रीड आणि संगणक नेटवर्कसारख्या डिजिटल व तंत्रज्ञानावर आधारित प्रणाल्यांवरील वाढत्या अवलंबनामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यांना अचूक आणि समक्रमित टाइम स्टॅम्पची गरज असते. सध्या वापरात असलेल्या वेगवेगळ्या वेळ स्रोतांमधील तफावतीमुळे या महत्त्वाच्या क्षेत्रांमधील समन्वय आणि नोंदणीवर विपरीत परिणाम होऊ शकतो, त्यामुळे देशात एकच समान राष्ट्रीय वेळ मानक असणे आवश्यक असल्याचे ग्राहक व्यवहार मंत्रालयाने स्पष्ट केले.

गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय येथे

# शिक्षक-पालक सभा उत्साहात संपन्न



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय, तिवसाघाट येथे शिक्षक-पालक सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, अभ्यासातील अडचणी समजून घेणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक व पालक यांच्यात समन्वय वाढविणे हा या सभेचा मुख्य उद्देश होता.

सभेमध्ये विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरी, उपस्थिती, शिस्त, अभ्यासातील सातत्य तसेच आगामी शैक्षणिक उपक्रमांबाबत पालकांना मार्गदर्शन केले. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसंदर्भात आपल्या सुचना व अपेक्षा मांडल्या तसेच एसएससी परीक्षेला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली आवेदन पत्रे भरावी व अभ्यासात सातत्य ठेवावे असे सुचित करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे सुधीर श्रीराव, शिक्षक ममता खासबागे, सतीश नेरकर, कुमुद भोरकर, शिक्षकेत्तर कर्मचारी हेमंत चौकडे, हिरेन्द्र देसली इत्यादी उपस्थित होते. शिक्षक व पालक यांच्या संयुक्त प्रयत्नातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सभेला पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कॉन्व्हेंट व जि.प.कन्या शाळेतील विद्यार्थ्यांची

# शिशु व बालरोग तज्ज्ञ डॉ.अंकुश कोरडे यांनी केली तपासणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – वरुड येथील नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ डॉ.अंकुश कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉन्व्हेंट व जि.प.कन्या शाळेतील विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी संपन्न झाली.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्कार इंग्लिश कॉन्व्हेंट, लोणी यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी विशेष सखोल आरोग्य तपासणी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ डॉ.अंकुश कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कार इंग्लिश कॉन्व्हेंट तसेच जि.प.कन्या शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळून आलेल्या आरोग्यविषयक बाबींवर विद्यार्थ्यांच्या पालकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना संतुलित व पौष्टिक आहार, वैयक्तिक स्वच्छता, भूख न लागणे, पुरेशी झोप, आरोग्यदायी जीवनशैली तसेच आजाराची कोणतीही लक्षणे जाणवल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. निरोगी विद्यार्थी म्हणजे सक्षम समाजाची पायाभरणी, शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या आरोग्यालाही प्राधान्य देण्याचा संदेश माजी सैनिक रवी पापडकर यांनी आपल्या भाषणातून दिला.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत शिक्षणाच्या पलीकडे जाऊन सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविणाऱ्या संस्कार इंग्लिश कॉन्व्हेंट लोणीच्या या उपक्रमाचे पालक, शिक्षक व नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. या प्रसंगी सैनिक रवि पापडकर, मुख्याध्यापिका स्वाती वानखडे, शिक्षिका मनीषा खोडे, पंकज झाडे, भारत पाचघरे, आशिष कोहळे, मंगेश पाटील, राजकुमार कुमरे, वैभव खुजे व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गालगत सीएनजी पाइपलाईनला गळती

धुळे-सोलापूर महामार्गावर वाहनांचा भार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**छत्रपती संभाजीनगर** – वैजापूर तालुक्यातील हडस पिंपळगाव शिवारात समृद्धी महामार्गालगत गेल कंपनीच्या गॅस पाइपलाईनला शनिवारी गळती लागल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ बंद करण्यात आली. खबरदारीचा उपाय म्हणून नागपूरच्या दिशेने जाणारी वाहतूक वळविण्यात आल्याने धुळे-सोलापूर महामार्गावर वाहनांचा भार वाढला.

माहिती मिळताच प्रशासन आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. संभाव्य धोका लक्षात घेऊन समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यानची वाहतूक धुळे-सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली. मुंबईकडून जाणारी वाहने हडस पिंपळगाव इंटरचेंजवरून उतरवून धुळे-सोलापूर महामार्गावरून माळीवाडा येथे पुन्हा समृद्धी महामार्गावर सोडण्यात येत होती. तर नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून वळवून हडस पिंपळगाव येथून पुन्हा महामार्गावर आणण्यात आली.



# पंतप्रधान मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान प्रदान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**ताश्कंद** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रविवारी परदेशी नेत्यांसाठी प्रदान करण्यात येणारा उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान 'ओलीय दर्जाली दोस्तलिक' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पंतप्रधान मोदींनी हा सन्मान भारत आणि उझबेकिस्तानमधील 'शाश्वत' संबंधांना समर्पित केला. व्यापार, स्वच्छ ऊर्जा आणि दळणवळणासह विविध क्षेत्रांतील संबंध मजबूत करण्यासाठी पंतप्रधान मोदी सध्या उझबेकिस्तानच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आहेत. 'ओलीय दर्जाली दोस्तलिक' पुरस्कार मिळाल्याबद्दल मला अत्यंत सन्मान वाटत आहे. मी हा पुरस्कार भारत आणि उझबेकिस्तानमधील शाश्वत संबंधांना समर्पित करतो,' असे मोदींनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने 'एक्स' वर म्हटले की, 'दोन्ही देशांमधील मैत्री मजबूत करण्यात योगदान दिल्याबद्दल' पंतप्रधानांना हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. पंतप्रधानांनी हा सन्मान भारतातील १४० कोटी जनतेला समर्पित केला आणि हा पुरस्कार दोन्ही संस्कृतींमधील शाश्वत मैत्रीचे प्रतीक असल्याचे अधोरेखित केले,' असे परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केले.

जनता हायस्कूल व एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयात

# राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनघाट** – जनता हायस्कुल व यांची मोघे कनिष्ठ महाविद्यालय येथे राष्ट्रीय क्रीडा दिवस मोठया उत्साहात आयोजीत करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक उमेश काळे तर प्रमुख अतिथी म्हणुन क्रीडा शिक्षक योगेश सावरकर व प्रविण गणोरकर हे मंचावर उपस्थित होते.

यावेळी हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या फोटोचे मान्यवरांच्या हस्ते पुजन व हारर्पण करण्यात आले. या वेळी क्रीडाशिक्षक प्रविण गणोरकर यांनी विद्यार्थ्यांना महत्वाची माहिति दिली व शारीरिक शिक्षणाचे धडे दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रविण गणोरकर यांनी तर आभार योगेश सावरकर यांनी मानले.

# शिकणाऱ्या मुलांच्या आयुष्यात निरांजन होऊ या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांचे शिक्षण परिषदेत आवाहन






**वरुड** – चंद्रमौळी झोपडीतुन ज्ञानाचा मंद दिवा तेवत ठेवत आपल्या मुलाला ती माता जेव्हा शाळेत दाखल करते तेव्हा झपाटुन शिकणाऱ्या त्या मुलांच्या आयुष्यात निरांजन होता आले पाहिजे, असे भावनिक आवाहन पं.स.गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी केले. वाडेगांव येथील जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक शाळेत आयोजित शिक्षण परिषदेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

गाडेगांव व राजुरा बाजार केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा वाडेगावच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष राहुल सोनुले विराजमान होते. व्यासपिठावर प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी मोहन नारिंगे, केंद्रप्रमुख अरविंद वानखडे उपस्थित होते. गाडे यांनी शिक्षकांशी हितगुज साधतांना भावनिक आवाहन केले.ते बोलतांना पुढे म्हणाले की, येणारा काळ अत्यंत गतिमान आहे. काळानुरुप शिक्षकांनी स्वतःला सज्ज करतांना आपली प्रकृती निरामय ठेवणे आवश्यक आहे. यावेळी त्यांनी 'आईचे डोळे' या लेखाचे वाचन केले असता शिक्षण परिषदेतील वातावरण भावनिक झाले होते. प्रारंभी केंद्रप्रमुख अरविंद वानखडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध उपक्रमांची माहिती विस्तार अधिकारी मोहन नारिंगे यांनी सांगितली.

शिक्षण परिषदेत खान अकॅडमी अंतर्गत गणित, विज्ञान विषयातील उपक्रमांबाबत विषय शिक्षक धनराज शेळके यांनी माहिती दिली. निपुन भारत या विषयावर संगीता कहाते यांनी मार्गदर्शन केले. शिष्यवृत्ती सराव परीक्षेबाबत संजय बेले यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सेवानिवृत्त झाल्याप्रित्यर्थ सुनिता लव्हाळे, बदली झालेले शिक्षक, शिक्षिका सुषमा झाडे, दामोदर ठाकरे, अमोल विधळे, गजानन बिजवे, सारीका ठाकरे, रंजनकुमार राठोड तसेच केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याप्रित्यर्थ शैला निवल यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका अंजली ठाकरे तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक भुषण दोड यांनी मानले.

या शिक्षण परिषदेला चंदन आडे, संजय फुटाणे, प्रकाश विंचुरकर, संजय बेले, देवानंद बागडे, संजय खाडे, महेश पवार, अरविंद बहुरूपी पाटील, पखाले, प्रशांत सेंदरकर, गजानन हुड, सुनिल कोडस्कर, सुरेश खंडारे, सचिन गाडबैल, प्रमोद मुऱ्हेकर, स्वाती वानखडे, सोनाली धोटे, अश्विनी चांभारे, सुनिता कुकडे, रंजना परतेती, वानखडे आदी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत्रा मृग बहार गळला : हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या

## तातडीने पंचनामे करण्याची शेतकरी अखिल माकोडे यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जामगाव-खडका, बारगाव, नागझिरी, परसोना, मांगोना, धामनदास, बेनोडा, गोरेगाव तसेच संपूर्ण बेनोडा मंडळ परिसरात संत्रा मिरुग बहर मोठ्या प्रमाणात गळत आहे.

झाडावरील संत्री अर्धवट अवस्थेतच खाली गळून पडत असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. एकीकडे संत्रा बहर गळतीचे संकट, तर दुसरीकडे परिसरात कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र आहे.

त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, शेतकऱ्यांना वालीच उरला नाही का? असा सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

या गंभीर परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकरी अखिल पंजाबराव माकोडे यांनी केली आहे. तसेच तहसीलदार, तलाठी (पटवारी) आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष शेतात जाऊन संत्रा बागांची





पाहणी करुन पंचनामे करावेत. पंचनाम्याचा योग्य अहवाल तयार करुन तो मुख्यमंत्री महोदय तसेच संबंधित कृषी विभागाकडे सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले संत्र्याचे पीक डोळ्यांसमोर जमिनीवर गळून पडत असताना शासनाने केवळ पाहणी न करता तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी.

संपूर्ण बेनोडा मंडळातील नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

---

न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे

# रक्षाबंधन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल बेनोडा येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला होता.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन बेनोडाचे पोलिस अधिकारी राजेंद्र इंगळे, आशिष काळे लाभले. या कार्यक्रमाला गुरुसेवा शिक्षण विकास संस्थेचे उपाध्यक्ष पंकज गोहाड,मुख्याध्यापक हर्षल झोड, प्रायमरी विभागाच्या प्रमुख अश्विनी श्रीराव, प्री प्रायमरी विभागाच्या प्रमुख मयुरी निशाण उपस्थित होत्या.





कार्यक्रमाची सुरुवात प्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करुन मान्यवरांच्या हस्ते झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शिक्षिका चित्रा वसुले यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

नर्सरी ते तिसऱ्या वर्गाच्या मुलांनी टाकाऊ वस्तूंपासून राख्या बनवल्य. चौथी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या इकोफ्रेंडली राख्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून तयार केलेल्या राख्यांचे संस्थेचे उपाध्यक्ष, मुख्याध्यापक, प्रमुख अतिथी, शिक्षकांनी कौतुक केले. त्यानंतर विद्यार्थीनींनी त्यांच्या वर्ग बांधवांना तसेच शिक्षिका व शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी प्रमुख अतिथी, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक, बस चालक यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थीनी तानिया नवले व आराध्या चौधरी तर आभार आर्या वानखेडे हिने मानले. या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

---



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय वरुड सेवा केंद्रात

# रक्षाबंधन सोहळा उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय वरुड सेवा केंद्राच्या वतीने रक्षाबंधन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रक्षाबंधनानिमित्त केंद्रावर विविध मान्यवर व नागरिकांना राखी बांधून आध्यात्मिक संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अमरावती येथून सीतादीदी, इंदिरादीदी, बी.के.राजेशभाई, बी.के.प्रमोदभाई यांच्यासह वरुड ब्रह्माकुमारी केंद्राच्या सेवाधारी भगिनी व बंधू उपस्थित होते. कार्यक्रमाला वरुड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे तसेच वरुड-मोर्शी मतदारसंघाचे आमदार चंदू यावलकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक तसेच ब्रह्माकुमारी केंद्राच्या विविध उपक्रमांना नेहमी सहकार्य करणारे बी.के.निळकंठ बेलसरे, नारायण ठाकरे, प्रमोद केने, राजेश खासबागे, नितीन खेरडे, दीपक खंडेलवाल, रंजन आखरे, डॉ.चरण सोनारे, डॉ.पंकज केचे, बंडू पैठणकर, भोंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सीतादीदी यांनी रक्षाबंधनाचे आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून, आत्मिक बंधुभाव, पवित्रता, सदभावना आणि सकारात्मक संकल्प यांची आठवण करुन देणारा आध्यात्मिक उत्सव असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन बिंदूदीदी यांनी केले. उपस्थित मान्यवरांना ब्रह्माकुमारी भगिनींच्या हस्ते राखी बांधुन शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात आध्यात्मिक वातावरणासोबतच सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित असलेले तसेच सहकार्य करणाऱ्या उपस्थितांचे बी.के.भारती दीदी यांनी आभार मानले.

---

# महायुतीत एकमेकांवर टीका करणे टाळा : समन्वय बैठकीत मुख्यमंत्र्यांची सूचना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महायुतीतील कोणत्याही घटकपक्षाच्या विरोधात विसंगत भूमिका घेत एकमेकांवर टीकाटिप्पणी करणे टाळले पाहिजे. महायुतीची सामूहिक भूमिकाच जनतेसमोर गेली पाहिजे, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या नेत्यांना दिल्या आहेत. अनेकदा



उत्तम समन्वय असूनही वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे अनावश्यक वाद निर्माण होतात. गैरसमजाचे वातावरण निर्माण होते, ते पूर्णपणे टाळण्यात यावे. तसेच, जिल्हा विकास निधीचे वाटप ठरलेल्या सूत्रानुसारच होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सोमवारी महायुतीच्या समन्वय समितीची बैठक पार पडली. रात्री उशीरापर्यंत चाललेल्या या बैठकीत शासकीय महामंडळांचे वाटप आणि नियुक्त्यांसोबतच जिल्हा विकास निधी, महायुतीतील समन्वय आदी मुद्दयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी झालेल्या चर्चेत महायुतीत अधिक समन्वय निर्माण करण्यावर फडणवीस यांनी विशेष भर दिल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

राज्यातील तिन्ही पक्षांमध्ये, तसेच महायुतीमधील सर्व १२ घटक पक्षांमधील समन्वय अधिक मजबूत व्हावा, हा बैठकीचा प्रमुख उद्देश होता. सरकारच्या सर्व योजना आणि विकासकामे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रभावीपणे पार पाडावी, यावर बैठकीत चर्चा झाली. महायुतीने महाराष्ट्रात पुन्हा एकदा प्रचंड मजबुतीने आणि एकजुटीने काम केले पाहिजे, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

---

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट प्री प्रायमरी येथे रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमीत विद्यार्थ्यांनी

# वृक्षांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने साजरे केले रक्षाबंधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – आज आगळ्या-वेगळ्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. मुलांनी शाळेच्या परिसरातील झाडांना राखी बांधुन वृक्षांचे रक्षण करु, पर्यावरणाचे संवर्धन करु असा संदेश दिला.

वृक्ष हे आपले खरे जीवनदाते असुन ते आपल्याला प्राणवायू, सावली, फळे आणि निसर्गाचे संतुलन देतात. त्यामुळे भावंडांमधील प्रेम व संरक्षणाचा संदेश देणाऱ्या रक्षाबंधनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी वृक्षांनाही आपला मित्र व भाऊ मानुन राखी बांधली.



यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा असा संदेश देत मुलांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. या अभिनव उपक्रमातुन विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम, पर्यावरणाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण झाली. रक्षाबंधनाचा सण केवळ भावंडांच्या नात्यापुरता मर्यादित न राहता मानव आणि निसर्ग यांच्यातील प्रेमाचे नाते दृढ करणारा ठरला. हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देणारा आहे.

अशा 'वृक्षाबंधन' उपक्रमांतुन झाडांच्या संरक्षणाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते. हा कार्यक्रम प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री प्रायमरीचे कॉर्डिनेटर पराग भोंडे तसेच पीआरओ किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या कौतुकस्पद उपक्रमाबद्दल संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले.

शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी सर्वांचे या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मोलाचे सहकार्य लाभले.

---


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९३/२०२६** **ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती प्रतिभा देविदास वानखडे, वय अं.५७ वर्ष, धंदा-घरकाम, २) विजय देविदासराव वानखडे, वय अं.३७ वर्ष, धंदा- मजुरी, ३) निखील देविदासराव वानखडे, वय अं.३४ वर्ष, धंदा- मजुरी, सर्व रा.जरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत देविदास पुंडलिकराव वानखडे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७२०/२०२६** **ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) सुशिला रामभाऊ कडू, वय अं.७९ वर्ष, धंदा-घरकाम, २) मनोज रामभाऊ कडू, वय अं.५० वर्ष, धंदा-मजुरी, ३) जितेंद्र रामभाऊ कडू, वय अं.४६ वर्ष, धंदा- शेती, तिघेही रा.शनिवार पेठ वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ४) अल्का सुरेश दवंडे, वय अं.४७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.जवाहर वार्ड सौंसर, ता.सौंसर, जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामभाऊ संपतराव कडु, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# मद्यपी सचिवाला पोलिसांनी थेट कार्यालयातुन नेले उचलुन

## अमडापुर ग्रामपंचायत कार्यालयातील घटना : सचिवाच्या मनमानी कारभारामुळे नागरिक वैतागले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या अमडापुर येथील ग्रामपंचायतीचे वादग्रस्त सचिव मनोज तायवाडे यांच्या मनमानी आणि गैरकारभारा विरुद्ध काल गावात प्रचंड उद्रेक झाला.



कार्यालयीन वेळेत मद्यपान करणे, महिलांना अपमानास्पद वागणुक देणे, बोगस ग्रामसभा घेणे आणि रक्षाबंधनासारख्या शासकीय सुटीच्या दिवशी रात्री ८ वाजता बेकायदेशीरपणे कार्यालय उघडणे, अशा गंभीर प्रकारांमुळे गावातील शेकडो तरुण आक्रमक झाले. गावात तणाव निर्माण झाल्यानंतर ग्रामपंचायत सदस्यांनी ११२ वर फोन करुन पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी तत्परता दाखवत संतप्त जमावासमोरुन सचिवाला थेट पोलिसांच्या गाडीत टाकुन पोलीस ठाण्यात नेले आणि शासकीय रुग्णालयात त्याची वैद्यकीय (रक्ताची) चाचणी केली. या धडक कारवाईमुळे संपूर्ण वरूड परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

रात्रीच्या अंधारात कार्यालय उघडल्याने संशय बळावला सरकारी नियमानुसार सुटीच्या दिवशी शासकीय कार्यालय उघडण्यास सक्त मनाई आहे. मात्र, रक्षाबंधनाची शासकीय सुटी असतानाही सचिव मनोज तायवाडे यांनी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गुपचुप गावात येऊन ग्रामपंचायत कार्यालय उघडले. रात्रीच्या अंधारात शासकीय रेकॉर्ड्स आणि महत्त्वाचे दस्तऐवज गायब करण्याचा किंवा त्यात बोगस नोंदी करण्याचा हा प्रयत्न होता का? असा संशय गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

याच कारणावरुन गावातील तरुण मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर जमा झाले होते. ग्रामपंचायत सदस्य प्रदीप सोनारे यांची तत्परता पोलीस दाखल सचिवाचा उद्दामपणा आणि कार्यालयाबाहेर तरुणांची वाढती गर्दी पाहुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप सोनार यांनी तातडीने ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन लावून पोलीस प्रशासनाला माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचे वाहन गावात दाखल झाले. गावकऱ्यांचा रोष पाहता पोलिसांनी तत्काळ पावले उचलत आरोपी सचिव मनोज तायवाडे याला ताब्यात घेतले गाडीत बसवुन थेट पोलीस ठाण्यात रवाना केले आणि शासकीय रुग्णालयात नेऊन रक्ताचे नमुने घेतले. महिला लोकप्रतिनिधींना त्रास आणि भ्रष्टाचाराचा कळस सचिवाच्या जाचाला सामान्य नागरिकांसह महिला लोकप्रतिनिधीही कंटाळल्या आहेत. कार्यालयात कामासाठी येणाऱ्या महिला वर्गाला अपमानास्पद वागणुक देणे, महिला सदस्यांना रात्री-अपरात्री फोन करून जाब विचारणे आणि थेट त्यांच्या घरी जाऊन वाद घालणे, असे गंभीर प्रकार समोर आले आहेत. याशिवाय, गावातील विकासकामे प्रलंबित ठेवुन नागरिकांकडे उघडपणे पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. दवंडी न देता बोगस ग्रामसभा तरुणांना धमक्या नियमानुसार ग्रामसभेची पूर्वकल्पना गावाला दवंडी देऊन देणे बंधनकारक असते. मात्र गावकऱ्यांना कोणतीही माहिती न देता परस्पर बोगस ग्रामसभा आटोपल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबद्दल गावकऱ्यांनी आणि तरुणांनी विचारणा केली असता, सचिवांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत 'तुम्हाला वरूड येथे पाहुन घेईल' अशी थेट धमकी गावकऱ्यांना दिली.

**तात्काळ निलंबनाची मागणी**

शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्या, मद्यधुंद अवस्थेत फिरणाऱ्या आणि महिलांशी असभ्य वर्तन करणाऱ्या या वादग्रस्त सचिवाचे तात्काळ निलंबन करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांनी गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. वैद्यकीय अहवाल आल्यानंतर सचिवावर बडतर्फीची कारवाई होणार का? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आ.उमेश यावलकरांना हजारो बहिणीनी बांधल्या राख्या

## लाडक्या बहिणींना रक्षाबंधन निमित्ताने साडयांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – भाजपा महिला आघाडीच्या वतीने आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या कार्यालयात २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजतापासुन रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे यावर्षी सुद्धा कार्यक्रमाचे कोणतेही आमंत्रण न देता तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी आपल्या लाडक्या भाऊरायाला ओवाळणी घालुन राखी बांधण्यासाठी स्वयंस्फुर्तीने अफाट गर्दी केल्याचे दिसून आले.






रक्षाबंधना निमित्त मोठ्या संख्येने उपस्थित लाडक्या बहिणींना आमदार उमेश यावलकर यांनी ओवाळणीत साड्यांची भेट दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले, मी सदैव माझ्या सर्व बहिणींच्या रक्षणासाठी खंबीरपणे उभा आहे. त्यांच्या प्रत्येक अडचणी समजुन घेत त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी सदैव तत्पर आहे. गतवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा माझ्या सर्व बहिणींनी उपस्थिती दर्शवुन कार्यक्रमाची शोभा वाढवल्याने मी त्यांचे मनापासून आभार मानतो. आज हजारोच्या संख्येने बहिणींनी माझ्या कार्यालयात उपस्थित राहुन मला ओवळले, मला राख्या बांधल्या त्यामुळे त्यांचे माझ्याप्रती असणारे प्रेम पुन्हा एकदा कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी सर्व उपस्थित बहिणींना माझ्या तर्फे साड्यांची भेट देण्यात आली आहे. त्यांनी ही छोटीशी भेट स्विकारुन प्रसन्नता दर्शवली आहे.

# शाळांमध्ये 'माता-पालक शैक्षणिक मेळावा'

## घर आणि शाळा यांच्यात समन्वय वाढवणार, वर्षातून चार वेळा आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – यंदापासून राज्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये 'माता-पालक शैक्षणिक मेळावा' हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.



हा उपक्रम केवळ औपचारिक पालकसभा न ठेवता माता-पालकांशी थेट संवाद साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी घर आणि शाळा यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात जुलै, ऑक्टोबर, जानेवारी आणि एप्रिल महिन्याच्या पहिल्या शनिवारी अशा वर्षातून चार वेळा माता-पालक शैक्षणिक मेळाव्यांचे आयोजन सर्व माध्यमांच्या शाळांना करावे लागणार आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या तसेच सर्व व्यवस्थापनांच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खासगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये हा मेळावा प्रत्यक्ष शाळास्तरावर आयोजित करावा लागणार आहे. या उपक्रमाच्या आयोजनाची प्राथमिक जबाबदारी मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीवर (एसएमसी) सोपविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत कुटुंबाची आणि विशेषतः आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, नियमित उपस्थिती टिकवून ठेवणे आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी माता-पालकांचा शैक्षणिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढवण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सर्व संबंधित गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांना आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये या उपक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना देण्याचे निर्देश दिले आहेत.





